
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-IV
October - December - 2019
MARATHI PART - III /
HINDI

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VIII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III / HINDI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जागतिकीकरणाचे कृषी अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>**प्रा. अशोक ताराचंद बावणे** | १-३ |
| २ | भारतीय कृषी क्षेत्राचे आर्थिक विकासात योगदान<br>**प्रा. अविनाश दिवाकर भुरसे** | ४-६ |
| ३ | महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्याची परिकल्पना<br>**डॉ. बी. आर. कत्तूरवार** | ७-९ |
| ४ | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे योगदान<br>**प्रा. राजेश एस. डोंगरे** | १०-१२ |
| ५ | ग्रामस्वराज्य गांधीजींची ग्रामीण विकासाची परिकल्पना<br>**डॉ. विभावरी बा. हाते** | १३-१५ |
| ६ | शेतकरी आत्महत्या आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय<br>**ईश्वर वाघ** | १६-२१ |
| ७ | शेतकरी आत्महत्या कारण आणि उपाय एक अभ्यास<br>**पडोळे कोंडीबा रमेश** | २२-२६ |
| ८ | ग्रामीण आदिवासी महिला समाजाचा विकास एक दृष्टीकोण<br>**कु. कविता रंजन लोखंडे** | |
| ९ | शेतकरी आत्महत्या आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय<br>**प्रा. महेन्द्र जानकीराम चव्हाण** | ३२-३६ |
| १० | भारताच्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेवर जागतीकीकरण आणि भांडवलशाहीचा परिणाम<br>**महेंद्र शांताराम साबळे** | ३७-४० |
| ११ | सुदृढग्रामीण अर्थव्यवस्थेची नाळ: लघु व कुटिर उद्योग<br>**डॉ. सौ. मंजूषा रा. ठाकरे** | ४१-४५ |
| १२ | शेतकरी आत्महत्या व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय एक अध्ययन<br>**मोहन विलास चुकाबोटलावर** | ४६-५१ |
| १३ | भारतातील ग्रामीण विकास - एक मूल्यमापन<br>**प्रा. डॉ. संजय कांबळे** | ५२-५५ |

# ३. महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्याची परिकल्पना

**डॉ. बी. आर. कत्तूरवार**
विभाग प्रमुख, लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र देगलूर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड.

वैभवशाली संस्कृतीचा वारसा लाभलेल्या भारत देशाचा सर्वांगिण विकास साधावयाचा असेल तर भारतातील प्रत्येक खेडेगाव महात्मा गांधी यांच्या विचारानुसार स्वयंपूर्ण, स्वावलंबी व स्वयंशासित करणे अत्यंत आवश्यक आहे. खरा भारत व भारतीय संस्कृती ही ग्रामीण भागात पहायला व अनुभवायला मिळते म्हणुन राष्ट्रपीता महात्मा गांधी यांनी आदर्श अशी ग्रामस्वराजयाची परीकल्पना मांडली आहे. व खेडयाकडे चला असा संदेश दिला.

प्राचीन काळापासून भारतात गावचा संपूर्ण कारभार गावातील जेष्ठ नागरिक **पंचमुखी परमेश्वर** या तत्वाला अनुसरुन चालवित होते. त्याकाळात लोक गावातील गरजा गावपातळीवर कशा भागविता येतील यादृष्टीने प्रयत्न करीत असत. महात्मा गांधी यांच्या ग्राम स्वराज्याच्या विचारात गावच्या कारभारात ग्रामपंचायतीस मध्यवर्ती स्थान होते. त्यांच्यामते ग्रामीण समाजाचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी प्राचीन काळापासून अस्तीत्वात असलेली एकमेव संस्था म्हणजे ग्रामपंचायत होय. त्यांनीच सर्वप्रथम वैचारिक पातळीवर ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली आहे. ते ग्रामस्वराज्य विषयक विचार मांडताना असे म्हणतात की, देशाची सामाजिक, आर्थिक व राजकीय शक्ती ग्रामीण भागासाठी उभी केल्यास लोकांचे श्रम वाया जाणार नाहीत. आपल्या मानवी गरजा भागविण्यासाठी त्यांना कोणाच्या तोंडाकडे पहावे लागणार नाही. शेतीतील संपत्ती गावातच राहील व गावे आर्थिक दृष्टया स्वयंपूर्ण होतील असा गांधीजीचा विश्वास होता. पक्षीय राजकारणाऐवजी सहमतीने व सर्वांच्या हीताच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला पाहीजे. अशा प्रकारचे विचार त्यांनी दि. 7 ऑगस्ट 1945 रोजी प्रसिध्द झालेल्या स्वराज्य या साप्ताहीकामध्ये नमूद केले होते.

लोकशाही ही केवळ राजयपध्दती नसून ती एक महत्वपूर्ण अशी जीवन प्रणाली आहे. आपल्या वर्तनातून, व्यवहारातून ती लोकशाही मूल्ये दिसली पाहीजेत. गाव ही एक अत्यंत महत्वपूर्ण संस्था असून तीचे नेतृत्व ग्रामपंचायत सदस्य व सरपंच करीत असतांना आपण जनतेचे सेवक आहोत मालक नाही याची जाणीव ठेवून गावचे नेतृत्व केले पाहीजे. नेतृत्व करीत असतांना सत्य आणि अहिंसा ही दोन तत्वे महत्वपूर्ण आहेत याची जाणिव ठेवून विविध कार्ये केली पाहीजेत. या ग्राम स्वराज्य व्यवस्थेत ग्राम न्यायालयास देखील खूप महत्व दिले जावे. गावातील मतभेद / भांडणे गाव स्तरावरच मिटविले जावेत. ग्राम स्वराज्यात श्रम आणि भांडवल यामध्ये वाद सांप्रदायिक दूर्भावना व वर्गभेदाला कोणतेही स्थान असू नये. ग्राम स्वराज्यात आहेरे - नाहीरे या दोन गटात म्हणजेच श्रीमंत व गरीब या दोन वर्गात असलेली दरी संपूष्टात आणण्याचे कार्य ग्राम पंचायतीच्या पुढाकारातून करण्यात यावे. गावातील समाज जीवनात प्रत्येकाने व्यवहार करीत असतांना सांप्रदायिक दुर्भावना ठेवू नये. सामाजीक सदभाव व गुन्हेगार वर्ग निर्माण होऊ नये म्हणून थोडया मात्रेत पोलीस दल व सेना असावी. राजनैतिक व विकास

विषयक प्रत्येक कामात लोकसहभाग वाढविण्यासाठी पंचायतीराज ला बळकट करुन सत्तेचे लोकशाही विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. महात्मा गांधीनी आपल्या यंग इंडीया मध्ये पंचायतराज विषयक विचार मांडताना असे नमूद केले आहे की, गावात अस्पृश्यतेची अमानवीय प्रथा नष्ट झाली पाहीजे, गावातील विहीरी व तलावाची स्वच्छता व संरक्षण केले पाहीजे. गावात एखादा व्यक्ती आजारी पडला तर त्याला वैद्यकीय सेवा गावातच उपलब्ध झाली पाहीजे. गावातील सर्व नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे म्हणून सर्वत्र स्वच्छतेची पूजा केली पाहीजे. गावातील सर्व मूले व मूलींना दर्जेदार व मोफत शिक्षण उपलब्ध करुन दिले पाहीजे. गावात एखाद्याने गुन्हा केल्यास त्याला सुधारण्याची संधी द्यावी. कोणावरही सामाजिक बहीष्कार कोणावरही टाकू नये. कोणत्याही पंचायतीला दंड आकारण्याची सत्ता असू नये तर ग्रामपंचायतीने दिलेल्या आदेश अथवा सूचनेचे पालन नागरीकांने स्वेच्छापूर्वक केले पाहीजे. तसेच कोणत्याही एखाद्या व्यक्तीला आपले विचार पंचायतीसमोर मांडायचे असतील तर त्यास संधी देण्यात यावी मात्र कोणत्याही व्यक्तीला साक्ष देण्याची सक्ती केली जाऊ नये.

गावातील ग्रामपंचायतीचे सदस्य निवडतांना संपूर्ण गावभर व दवंडी वाजवून सर्व ग्रामस्थांच्या उपस्थीतीत पंचाची निवड सामोपचाराने व एकमताने करण्यात यावी. तसेच ग्राम पंचायत सदस्यांना गावातील केवळ दिवानी दावे सोडविण्याचा अधिकार असावा. त्यांना कोणत्याही स्वरुपाचे फौजदारी वाद मिटविण्याचा अधिकार नसावा.

गावातील प्रत्येक घरामध्ये स्वच्छता, पुरेसा प्रकार व पुरेशी खेळती हवा असली पाहीजे. ग्रामस्थाला व्यक्तीगत व सामूहीक स्तरावर आवश्यक असलेल्या वस्तू गावातच तयार करण्यात यावे. घरासमोरील आंगण ऐवढे असावे की, जीथे गायी, म्हशी, बैल यांच्यासाठी गोठा असावा तसेच कुटूंबाला आवश्यक असलेला भाजीपाला सहज उपलब्ध होईल अशी जागा घराशेजारी विकसीत करावी. प्रत्येक व्यक्तीच्या गरजेइतके अन्न, भाजी, फळे, खादी कपडा उपलब्ध करुन दिला पाहीजे. तरच ग्रामस्वराज्याच्या रुपाने प्राचीन भारतातील रामराज्याची संकल्पना साकार होईल. इ.स. 1949 मध्ये तत्कालीन मुंबई राज्यात ग्रामीण विकासासाठी सर्वोदय कार्यक्रम राबविण्यात आला. ग्रामीण भागाचा संर्वागीण विकास करण्यासाठी भारतीय संविधानातील मार्गदर्शक तथा नितीनिर्देशक तत्वामध्ये सरकार पंचायतीराज व्यवस्था स्थापन करेल व लोकशाही विकेंद्रीकरणाला प्राध्यान देईल व त्यासाठी अनेक खेडेगावात ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी सरकारने पुढकार घ्यावा. संविधानात स्थानिक शासन हा विषय भारतीय लोकशाहीचा पाया मजबुत करण्यासाठी, शासन कारभारात लोकसहभाग वाढविण्यासाठी, लोकांना लोकशाहीचे प्रशीक्षण देण्यासाठी, विकास कामात जनतेचा प्रत्यक्ष सहभाग वाढविण्यासाठी आणि स्थानीक भागातील विविध समस्या स्थानिक पातळीवर सोडविल्या जाव्यात म्हणुन लोकशाही विकेंद्रीकरणाची विविध तरतुदी भारतीय संविधानात करण्यात आले आहेत.

एकविसावे शतक हे मानवाच्या उन्नतीचे व उत्कर्षाचे शतक असले तरी मानवाने केलेल्या प्रगतीला जोपर्यंत नितीचे अधिष्ठान असणार नाही तोपर्यंत केलेली उन्नती पूर्ण होवू शकत नाही. आज मानवता, माणूसकी व नैतिकता या आदर्श मानवी मुल्यांची मोठया प्रमाणात अवहेलना होत आहे. या बिकट व भोगवादी चक्रातून मानवी जीवन सुरक्षीत ठेवायचे असेल तर गांधीजीच्या पाऊलावर पाऊल टाकणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे जात्याच्या खुंटीला धरुन असणारे मुठभर दाने जात्यात भरडले

जात नाहीत व त्यांचे पीठ देखील होत नाही त्याप्रमाणे एकविसाव्या शतकात ज्या व्यक्ती गांधी विचार व भगवदगीतेतील विचाराला अनुसरुन जीवन जगत आहेत. त्यांचे जीवन सुखी, समाधानी व संपन्न बनु शकते.

गांधीजीच्या विचाराप्रमाणे भारतातील प्रत्येक खेडेगाव स्वयंपूर्ण, स्वावलंबी व स्वयंशासीत बनल्यास खऱ्या अर्थाने शेतकरी आत्महत्ये सारख्या गंभीर समस्या देखील संपूष्टात येवू शकतात. अर्थात गांधीजींचे तत्वज्ञान ऐकण्यासाठी, वाचण्यासाठी, पाहण्यासाठी व चर्चा करण्यासाठी खूप आदर्श व चांगले वाटत असले तरी जोपर्यंत ते विचार प्रत्येक व्यक्तीच्या वाणी, वर्तन व विचारात दिसणार नाहीत तोपर्यंत एक महासत्ताक राष्ट्र म्हणून भारताचा उदय होणार नाही.

**संदर्भग्रंथ सूची**


- Amol Mandal - Woman in pachayatraj Institution.
- Dipen Roy, Richard S. -Panchayat Raj Institution.
- Eqbal Narayan - Panchayatiraj Administration in Maharashtra.
- Narain Iqbal - Panchayat Raj Administration in Maharashtra.
- आवळे मनोज - पंचायत राज कार्य, कायदा योजना.
- कापडनीस द.गो. - पंचायत राज भाग 1 व 2
- डॉ.दर्शनकार अर्जूनराव - पंचायत राज व नागरी प्रशासन.
- डॉ.पाटील वा.भा. - पंचायत राज
- श्रीवास्तव अरुण - भारत में पंचायत राज
- विजय रंजन दास - पंचायत राज संकल्पना और वर्तमान स्वरुप